# धुळे महानगरपालिका,धुळे

मा.प्रशासक तथा आयुक्त
नगरसचिव कार्यालय

---

## स्थायी समिती सभा क्रमांक ४४

---

महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक:-एमसीओ-२०२३/प्र.क्र.४३१/नवि१४ दि. २९/१२/२०२३ नुसार महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदीत अंतर्भुत केलेल्या कलम ४५२ अ (१अ) अन्वये मा.प्रशासक सो. यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार स्थायी समितीची विशेष सभा **गुरुवार दिनांक २२/०१/२०२६ सायंकाळी ५-०० वाजता स्व. स्व.दिलीप पायगुडे सभागृहात आयुक्त तथा प्रशासक श्री.नितीन कापडणीस यांच्या अध्यक्षतेखाली** संपन्न झाली. सदर सभेस खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. नितीन कापडणीस | आयुक्त तथा प्रशासक |
| २. | श्रीमती स्वालिहा मालगावे | उपायुक्त |
| ३. | श्री राजेंद्र माईनकर | सहा. आयुक्त |
| ४. | श्री सागर जकातदार | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. बाळासाहेब तट्टू | मुख्य लेखाधिकारी |
| ६. | श्री शाहेद शेख | मुख्य लेखापरिक्षक |
| ७. | श्री.मनोज वाघ | नगरसचिव |
| ८. | श्री.नवनीत सोनवणे | कार्यकारी अभियंता पा.पू.वि. |
| ९. | श्रीमती वर्षा घुगरी | कार्य.अभियंता स्थापत्य विभाग |
| १०. | श्री एन के बागुल | उप अभियंता विद्युत |
| ११. | श्री प्रदीप चव्हाण | कार्य.अभियंता बांधकाम विभाग |
| १२. | श्री प्रकाश सोनवणे | उप अभियंता नगररचना |
| १३. | श्री. चंद्रकांत मोरे | उप लेखापाल |
| १४. | श्री नरेश अटलाणी | लेखा विभाग |
| १५. | श्रीमती मीना सातभाई | समाज विकास अधिकारी |
| १६. | डॉ. संपदा कुलकर्णी | प्र. आरोग्याधिकारी |
| १७. | श्री.लक्ष्मण पाटील | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १८. | श्री राजेश वसावे | मुख्य स्वच्छता निरिक्षक |
| १९. | श्री के.डी साबळे | लिपिक आस्थापना |
| २०. | श्री कमलेश सोनवणे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| २१. | श्री हेमंत पावटे | सहा. अभि. नगररचना विभाग |
| २२. | श्री. दुष्यंत महाजन | अग्निशमन विभाग |
| २३. | श्री.अरुण चौधरी | मनपा शिक्षण मंडळ |
| २४. | श्री.प्रसाद जाधव | अतिक्रमण विभागप्रमुख |
| २५. | श्री रविकिरण पाटकरी | वृक्ष विभाग प्रमुख |
| २६. | श्रीमती कल्पना जाधव | अभिलेखापाल |
| २७. | श्री बसीत पठान | सिस्टीम मॅनेजर |

म.नगरसचिव वंदे मातरम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

मा.प्रशासक:- आजच्या सभेचे कामकाजास सुरूवात करण्यात यावे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

मा. आयुक्त तथा प्रशासक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम, कलम ९५ नुसार सन २०२५-२६ चा सुधारित व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प आज मा. स्थायी समिती समोर सादर करीत आहे.

सन २०२५-२६ चा सुधारीत अर्थसंकल्प व सन २०२६-२७ चा मूळ अर्थसंकल्प सादर करतांना महानगरपालिका क्षेत्रातील सर्व घटकांचा विचार करून सर्व समावेशक अर्थसंकल्प तयार करण्याचा प्रयत्न केला आहे. जमा व खर्चाचा अंदाज प्रथम मा. स्थायी समिती समोर व मा.स्थायी समिती मार्फत नंतर मा.महासभे मध्ये सादर करून मंजूर केला जातो. अर्थसंकल्प तयार करतांना वस्तुनिष्ठ व काटेकोर आर्थिक नियोजन करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलेला आहे.

धुळे महानगरपालिकेचा सुधारीत अर्थ संकल्प सन २०२५-२६ मध्ये सुरवातीच्या शिल्लकेसह महसुली तथा भांडवली जमा रूपये ७६९.६१ कोटीचा असून त्या मधून महसुली तथा भांडवली खर्च रुपये ६७९.४७ कोटी अपेक्षित आहे. तसेच शासन निधी रु. ७६.५९ कोटी व मनपा निधीची रु. १३.५५ कोटी निधी शिलकीचा सुधारीत अर्थसंकल्प सादर करीत आहे.

तसेच सन २०२६-२७ चे मूळ प्रस्तावित अर्थसंकल्पात सुरवातीच्या शिल्लकेसह महसुली तथा भांडवली जमा रूपये ९१४.२५ कोटी असून त्या मधून महसुली तथा भांडवली खर्च ९१३.५१ कोटी अपेक्षित आहे. यानुसार शासन अनुदानाचे रु.१.३५ लक्ष व मनपा निधी रु. ७२.२१ लक्ष शिलकीचा मुळ अर्थसंकल्प सादर करीत आहोत.

महानगरपालिकेचा अर्थसंकल्प सादर करतांना मुख्यत्वे शहराच्या विकासासाठी खालील महत्वपुर्ण कामे / योजना प्राधान्याने पुर्ण करण्याचा आमचा संकल्प असेल.

१) प्रधानमंत्री ई-बस योजना कार्यान्वीत करणे.
२) मुख्य शहरातील वाणिज्य संकुलांचा विकास करणे.
   अ) पांच कंदिल येथील प्रस्तावित व्यापारी संकुल
   आ)संत सावता माळी व्यापारी संकुल
   इ) दसेरा मैदान व्यापारी संकुल
   ई) सरकार महर्षी दादासाहेब रावल भाजी मंडई, देवपुर
   उ) जयहिंद व्यापारी संकुल, देवपुर
   ऊ) वलवाडी भागात आरक्षित जागेवर भाजी मंडई विकसीत करणे.
३) ट्रक टर्मिनल विकसीत करणे
४) प्रभाग समिती कार्यालय कार्यान्वित करणे
५) मुख्यालय व प्रभाग समिती कार्यालये या ठिकाणी नागरी सुविधा केंद्रे (CFC) केंद्रे चालू करणे.
६) नागरीकांना चांगल्या आरोग्य सोयी उपलब्ध होण्यासाठी मध्यवर्ती रोग निदान केन्द्र कार्यान्वीत करणे.
७) महानगरपालिकेच्या शाळांचे मॉडेल स्कुल च्या धर्ती वर आधुनिकीकरण करणे.
८) नागरीकांना ऑनलाइन सुविधा पुरविणे

मला महानगरपालिका कामकाजात अशा प्रकारे नियोजनबध्द विकासासाठी महानगरपालिकेचे सर्व पदाधिकारी व सदस्य तसेच अधिकारी व कर्मचारी यांच्या सहकार्याने विकास कामे करण्यामध्ये मनस्वी आनंद होत आहे. तसेच सदर अर्थसंकल्प तयार करीत असतांना अति.आयुक्त, उपायुक्त,कर मुल्यनिर्धारण अधिकारी, मुख्य वित्त व लेखाधिकारी, मुख्यलेखापरिक्षक, नगररचनाकार, लेखा विभाग व सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी या सर्वांचा मी आभारी आहे.

म. नगरसचिव — यापुर्वीच प्राथमिक स्तरावर बैठक होवुन आपल्या मार्फतच हा अर्थसंकल्प आपल्या विभागाच्या मागणीनुसार व पुढील आर्थिक वर्षाच्या नियोजनानुसार तयार केला आहे. तरी आपण अवलोकन करुन विभाग निहाय तरतुद करावयाची असल्यास त्या सुचवाव्या व त्याची नोंद घेवुन मे. स्थायी समितीपुढे अंतिम होईल.

मा.कार्य. अभियंता — अमृत २.० अंतर्गत १४९.७७ कोटी रुपयांचे कर्ज प्राप्त होणार आहे. लवकरच त्याचा यात समावेश झालेला दिसुन येत नाही. त्याचा समावेश व्हावा अशी विनंती आहे. तसेच वाहन विभागाची तरतुद करावी. आपल्याला अतिक्रमण विभागाकरीता क्रेन विकत घ्यावी लागणार आहे.

मा.मु.लेखा अधिकारी — जास्तीत जास्त वापर होण्याच्या दृष्टीने १ ऐवजी २ खरेदी कराव्या.

मा.आयुक्त तथा प्रशासक — यात १५-१५ टनापर्यंत २ गाडया घेवु शकता, तसेच नालेसफाईसाठी वाहन खरेदी करावे. यात २ कोटीपर्यंत तरतुद करावी. स्पेसिफिक वाहने निश्चीत करा.

मा.कार्य.अभियंता — यात हायड्रा २, नालामॅन २ विथ ट्रॅक्टर खरेदी करावे लागतील.

मा.आयुक्त तथा प्रशासक — तसेच आरोग्य विभागासाठी सक्शन व्हॅन जे मोठे ट्रक असतात ते ४ लागतील. यासाठी १ कोटीची तरतुद करण्यात येत आहे. तसेच खरेदी प्रक्रिया लगेच सुरु करावी.

मा.उपअभियंता विद्युत — अमृत २ अभियानाअंतर्गत सुकवद व बाभळे या दोन्ही पंपींग स्टेशनला १-१ मेगावॅटचे प्रत्येकी सोलर प्लँटचे काम प्रगतीमध्ये आहे. त्या बाभळेचे काम पुर्ण झाले आहे व सुकवदचे इन्स्टॉलेशन सुरु आहे. आपण जो डीपीआर सादर केला होता, त्यात ग्रीड कनेक्टीव्हिटीसाठी आवश्यक ट्रान्सफॉर्मर चे कॉस्टींग यात गृहीत धरले नव्हते. त्याचा खर्च विथ इक्वीपमेंट, केबल कनेक्शन याचा खर्च २ कोटी ११ लाख आहे. तो यात समाविष्ट करावा ही विनंती. २ मेगावॅट एनर्जी जनरेट होईल.

मा.आयुक्त तथा प्रशासक — २ मेगावॅटची एनर्जीचे वापराचे काय नियोजन आहे.

मा.उपअभियंता — सुकवद व बाभळेचे जे कंझप्शन आहे, त्याचे बिलींग अबव्ह ३५ लक्ष आहे. त्यात बचत होईल. सर्वात जास्त कंझप्शन सुकवद व बाभळेचे आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — एक्स्ट्रा एनर्जी जनरेट झाली तर एमएसईडीएल शी पॉवर परचेस ॲग्रीमेंटसाठी आधीपासुन तयारी करावी. तसेच निविदेसाठी तयारी करावी. सोबत फलॅश करावी.

मा.उपअभियंता — मनपा शिक्षण मंडळाकडे हस्तांतरीत झालेल्या १५ शाळांचे विज बिल आपण भरतोय त्यासाठी १५ केव्हीपी ऑन ग्रिड सोलर सिस्टीम प्रपोज करतोय, त्यासाठी ७६ लाख ७८ खर्च आहे.

मा. आयुक्त तथा प्रशासक — तसेच या शाळांमध्ये गरजेची गोष्ट अशी की, तेथे पिण्याचे व वापराचे पाणी नाही आहे. तर १५ शाळांसाठी १५ सोलर पंप व त्यासाठी पाईपची तरतुद करण्यात येत आहे. तसेच याची निविदा करावी.

मा.उपअभियंता विद्युत — तसेच अनावधानाने स्पील ओव्हरची तरतुद यात केली नाही. ती करुन घ्यावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक — कॉमन स्पील ओव्हरमध्ये तरतुद करण्यात येत आहे.

मा.कार्य. अभियंता बांधकाम — सुप्रीम कोर्टाच्या आदेशाने श्वानांसाठी कायमस्वरुपी निवारा केंद्रासाठी ३ कोटीचीतरतुद केली आहे. श्रीराम सृष्टी विकसीत करतोय स. नं. ५१० येथे तेथे १ कोटी तरतुद करावी. तसेच फायनल प्लॉट नं. ३ येथे संत सावता माळी मार्केटसाठी १६ कोटी तरतुद केली आहे.

मा.आयुक्त तथा प्रशासक — श्वानांसाठी कायमस्वरुपी निवाराकेंद्राच्या निविदा प्रक्रिया सुरु करावी. सोनवणे सो., चव्हाण सो., बागुल सो. आता जे विषय मांडले त्याचे अंदाजपत्रके तयार असतील तर तात्काळ विषय पत्र स्थायी साठी सादर करावे. सन २०२५-२६ चे सुधारीत अर्थसंकल्पात डॉग शेल्टर, बाभळे येथे सोलार प्रकल्प व मनपा शाळांचे सोलार व दुरुस्तीसाठी निविदा करीता रु.१

लक्षची टोकन तरतूद करण्यात येत असून व उपरोक्त बाबींसाठी व इतर अनुषंगीकबाबी साठी खालीलप्रमाणे सन २०२६-२७ च्या मुळ अंदाजपत्रकात दुरूस्ती/ सुधारणा करण्यात यावी.

मा.सिस्टीम मॅनेजर ४ प्रभाग समिती कार्यालये स्थापन होत आहे, यात मॅनपावरसह एकुण २ कोटीची तरतुद करावी. तसेच जन्म व मृत्युचा डाटा आहे, त्यासाठी १० लाखाची तरतुद करावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक यासाठी लोकसहभागातुन संगणक आणण्यासाठी प्रयत्न करु फर्नीचरसाठी तरतुद करावी.

मा.सिस्टीम मॅनेजर यात फर्निचर व नेटकनेक्टीव्हीटीसाठी १ कोटीची तरतुद करावी.

मा.आयुक्त तथा प्रशासक आयुर्वेदिक दवाखाने नुतनीकरणासाठी २५ लाख तरतुद करण्यात येत आहे. यासाठी वेगळे शिर्षक तयार करावे.

मा.नगरसचिव ८१ नगरसेवक पहिल्या महासभेपासुन पदार्पण करतील. त्यांचे वार्षिक मानधन व महापौरांसाठी आतिथ्य भत्ता याची तरतुद करावी अशी विनंती.

मा.आयुक्त तथा प्रशासक हा अर्थसंकल्प मी येथे मान्य व अंतिम करीत आहे. लेखा विभागाने आजच्या बैठकीतील सुधारणांसह दुरुस्ती करुन मे. महासभेसमोर सादर करावा.

**धुळे मनपा स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक ६६६ दिनांक २२/०१/२०२६**

मा.आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे यांचे कडील जा.क्रं.धुमपा /लेखा/१७६ दि. २०/०१/२०२६ अन्वये मा.आयुक्त सो.यांचेकडून (मा.स्थायी समिती) / मा.प्रशासक यांच्यापुढे सादर होणारे सन २०२५-२६ चे सुधारीत व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रकासाठी जमा व खर्चाच्या अंदाजाचे विवरण सादर करण्यात आलेले होते.

सन २०२५-२६ चे सुधारीत व सन २०२६-२७ चे मुळ अंदाजपत्रकातील जमा व खर्चाच्या प्रत्येकबाबीवर अभ्यास करून तसेच विचार विनियम करून सन २०२५-२६ चे सुधारीत अर्थसंकल्पात डॉग शेल्टर, बाभळे येथे सोलार प्रकल्प व मनपा शाळांचे सोलार व दुरुस्तीसाठी निविदा करीता रु.१ लक्षची टोकन तरतूद करण्यात येत असून व उपरोक्त बाबींसाठी व इतर अनुषंगीकबाबी साठी खालीलप्रमाणे सन २०२६-२७ च्या मुळ अंदाजपत्रकात दुरूस्ती/ सुधारणा करून मे.महासभेपुढे शिफारस करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच खालील नमूद केलेल्याबाबीसाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षांत दर्शविण्यात आलेली तरतूद ही प्राथमिक स्वरूपाची तरतूद असून संबंधित विभागांनी याबाबत डिसेंबर अखेर प्रत्यक्ष होणाऱ्या रक्कमेचे पुर्नविनियोजन अथवा पुरक मागणी करून सुधारीत अंदाजपत्रकात करून घेणे आवश्यक असेल या अटीवर खालील नमूद तरतूदी करण्यात येत आहे.

**जमा बाजू (महसुली व भांडवली)**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | प्रशासनाने केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | अमृत २.० मलनिस्सारण योजना युआयडीएफ अंतर्गत कर्ज | ० | २५ कोटी | २५ कोटी |
| २. | बखळ जागांचे सुधारीत दरानुसार अपेक्षित उत्पन्न | ० | २ कोटी | २ कोटी |
| ३. | मनपा हद्दीतील नवीन घरांना मालमत्ता कर आकारणीपासून उत्पन्न | ०० | ८ कोटी | ८ कोटी |

**खर्च बाजू (महसुली व भांडवली)**

| अ.क्र. | लेखाशिर्षक | प्रशासनाने केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी() | वाढ |
|---|---|---|---|---|
| १. | अमृत २.० मलनिस्सारण योजना युआयडीएफ अंतर्गत कर्ज | ० | २५ कोटी | २५ कोटी |
| २. | श्वान निवारा केन्द्र (Permanent Dog Shelter) तयार करणे | ० | ३ कोटी | ३ कोटी |
| ३. | लहान मुलांसाठी उद्यान निर्मिती करणे (Children Park) | ० | २ कोटी | २ कोटी |
| ४. | सोलर प्रकल्प | ० | २.५० कोटी | २.५० कोटी |
| ५. | मनपा शाळांना सौर विद्युत सुविधा पुरविणे | ० | १ कोटी | १ कोटी |
| ६. | अतिक्रमण विभाग वाहन खरेदी | ५० लक्ष | १ कोटी | ५० लक्ष |
| ७. | मनपा मालकीच्या जागांवर नावांचे फलक लावणे | ० | ५० लक्ष | ५० लक्ष |
| ८. | फेरीवाला धोरण फलक लावणे | ०० | ५० लक्ष | ५० लक्ष |

उपरोक्त प्रमाणे दुरूस्ती/सुधारणा **केल्यानंतर सन २०२५-२६ चे रक्कम रू.९६९.६१ कोटीचे सुधारीत व सन २०२६-२७ चे रक्कम रू.९४९.२५ कोटीचे मुळ अंदाजपत्रक** मे.महासभेपुढे शिफारस करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच या अनुषंगाने राखीव तरतूदीतील पाच टक्केवाढ करणेस मान्यता देण्यात येत आहे.

वैधानिक कार्यवाही करावी.

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका**

**तद्नंतर मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या आदेशाने राष्ट्रगीत गायनानंतर बैठक समाप्त करण्यात आली.**

**सही/- x x x**
**नितीन कापडणीस,**
**आयुक्त तथा प्रशासक,**
**धुळे महानगरपालिका**